संशोधन आराखडा

“अहमदनगर जिल्हयातील शेंळीमेंढी पालन व्यावसायिकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास ” (विशेष संदर्भ कर्जत, श्रींगोदा व जामखेड तालुका – २०१४ ते २०१९.)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

अंतर्गत सामाजिक शास्त्रे विद्याशाखेतील अर्थशास्त्र विषयातील पीएच. डी.पदवी मिळवण्यासाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा.

• संशोधक •

प्रा. विठ्ठल व्यंकटी कासले
एम. ए. (अर्थशास्त्र), बी.एड., नेट,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
महात्मा फुले नूतन महाविद्यालय,
मिरजगांव, ता.कर्जत,
जि. अहमदनगर –४१४४०१.
vvkasle121@gmail.com

• संशोधन मार्गदर्शक •

डॉ.दिलीप साहेबराव काकडे
एम.ए.(अर्थशास्त्र),पीएच.डी.
अर्थशास्त्र विभाग,
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, हदगांव
जि.नांदेड –४३१७१२
dilipkakde2011@gmail.com

एप्रिल – २०१९

“अहमदनगर जिल्हयातील शेंळीमेंढी पालन व्यावसायिकांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास ”[विशेष संदर्भ कर्जत, श्रींगोदा व जामखेड तालुका – २०१४ ते २०१९.]

भारत हा कृषिप्रधान देश असून भारतात एकूण लोकसंख्येच्या ५९ टक्के लोक शेती हा व्यवसाय करतात. भारतातील मुख्य व्यवसाय शेती हा आहे.म्हणून शेती व्यवसायाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. म्हणूनच भारतात शेतीला अर्थव्यवस्थेचा ‘कणा’ मानला जातो.

स्वातंत्र्यत्तोर काळात मागील पाच दशकात अवजड उद्योगांनाही महत्त्व देण्यात आले. भारतात उद्योगधंद्याचा विकास झाल्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा कमी झाला असला तरी अजूनही शेतीला इतर कोणत्याही क्षेत्रापेक्षा महत्त्वाचे स्थान आहे. भारताचा भूप्रदेश विस्तीर्ण व शेती व्यवसायस अनुकूल असल्याने शेती व शेतीबरोबर पशुसंवर्धन इत्यादी सारखे पुरक व्यवसाय वाढल्याचे दिसून येतात. भारतीय शेतीची दर एककरी उत्पादकता कमी असल्याकारणाने बरेचशे शेतकरी सध्या शेतीला पुरक व्यवसाय किंवा शेती व्यवसायाला जोंडधंदा म्हणून पशूपालन हा व्यवसाय करतात. उदा– शेळीमेंढी पालन, कुकुटपालन, बदकपालन, वराहपालन, ससेपालन, मत्स्यपालन इत्यादी व्यवसायाचा समावेश होतो.

पशूपालनाच्या बाबतीत जगात भारताचा पहिला क्रमांक लागतो. जगातील एकूण पशूंच्या संख्येपैकी भारतात सुमारे १६ टक्के एवढे पशुधन आहे. पशुपासून दूध, मांस, लोकर, हाडे, चामडी, खत इत्यादी मिळत असल्याने भारतासांरख्या शेती प्रधान देशात पशूपालनाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

अहमदनगर जिल्हयाचे पर्जन्यमान अनिश्चित स्वरूपाचे असून पर्जन्याची वाटणी ही असमान आहे. जिल्हयाच्या सर्वच भागात सारखा पाऊस पडत नाही. कर्जत, श्रीगोंदा व जामखेड या तालुक्यातील सरासरी पर्जन्यमान इतर तालुक्यापेक्षा कमी आहे, त्यामुळे सध्याच्या काळात शेती व्यवसाय हा अगदी तोटयाचा झाला आहे. शेती व्यवसायामुळे शेतकरी कर्जबाजारी झाला असून,तो आत्महत्येकडे वळतो आहे. शेती ही कोरडवाहू व निसर्गावर अवलंबून आहे. ओलीत क्षेत्रात वाढ झालेली नाही. लहरी पावसामुळे शेती व्यवसाय बेभरवशाचा झाला आहे. त्यामुळे शेती व्यवसाय म्हणून कमी खर्च व जास्त उत्पन्न देणाऱ्या शेळीमेंढी पालन व्यवसायाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

पूर्वीच्या काळात धनगर हा समाज उदरनिर्वाहासाठी शेंळीमेंढी पालन हा व्यवसाय करीत असे.नंतरच्या काळात शेतीक्षेत्राच्या विकासाच्या टप्प्यात शेळीमेंढीपालनाला व्यवसायाचे स्वरूप प्राप्त झाले आणि तो शेतीसोबत जोडला गेला. आज बहुतांशी लहान, मध्यम शेतकऱ्यांकडे गायी, म्हशी आणि बैलाशिवाय शेळयामेंढया असलेल्या पाहावयास मिळतात. शेळीपालन हा व्यवसाय भूमीहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, निराधार स्त्रिया यांना करता येतो. त्यामुळे शेळीला “गरीबाची गाय” असे संबोधले जाते.

शेळया व मेंढया हया पडीत जमिनीत किंवा डोंगरावरील वनस्पतीवर चरतात. त्यामुळे त्यांच्यावर होणारा खर्च हा फारच कमी असतो शक्यतोवर नसतो. गायी—म्हशीच्या तुलनेत शेळया— मेंढयाचा गाभण काळ हा कमी असतो. म्हणजेच पाच ते सहा महिन्याचा असतो. त्यामुळे कमी दिवसामध्ये शेळयामेंढयांची संख्या ही झपाटयाने वाढते. शेळयामेंढयापासून दूध आणि मांसासोबत लेंढीरूपी खत ही मिळते. शेळयामेंढयाच्या खतावर गोबर गॅस चालतो. त्यामुळे जंगलतोड कमी होते तसेच लेंढी पासून शेतीला चांगले खत मिळते. रासायनिक खताचा वापर न करता शेती करता येते व पैशाची बचत होते. शेळीमेंढीच्या मासांमध्ये चरबीचे प्रमाण कमी असते. व सर्वच धर्मातील लोक शेळीमेंढीचे मांस खातात. त्यामुळे या मांसाला भारतात फार मोठया प्रमाणात मागणी आहे.

जगातील मांस वापरापैकी ३५ टक्के मांस हे शेळयामेंढयाचे असते. जगातील ४९ टक्के लोक शेळीचे दुध वापरतात. औषधी दृष्टया या दुधाचा उपयोग मोठया प्रमाणात केला जातो. शेळीमेंढीचे दूध हे आयुर्वेदिक असून लहान मुलांस अतिसार, जुलाब होत असतील तर ते पाजल्यास ताबडतोब जुलाब बंद होतात. तसेच टी.बी झालेल्या ॠग्णाला हे दूध घेण्याचा सल्ला डॉक्टर देतात. ‘अ’ जीवनसत्वाचे प्रमाण शेळीमेंढीच्या दुधात जास्त असते. अशा विविध उपयोगामध्ये शेळीमेंढी पालन व्यवसाय सध्या लोकप्रिय होत आहे.

प्रस्तूत शोध प्रबंधात अहमदनगर जिल्हयातील शेळीमेंढी पालन व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास तसेच शेळी व मेंढीपालन व्यावसायिकांच्या समस्या व त्यांच्यावर होणारे परिणाम व उपाययोजना इत्यादीचा अभ्यास करावयाचे योजिले आहे.

- **विषय निवडीचा उद्देश :—**

१) अहमदनगर जिल्हयातील शेळीमेंढी पालन व्यावसायिकांचा अभ्यास करणे.

२) अहमदनगर जिल्हयातील शेळीमेंढी पालन व्यावसायामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.

३) शेळीमेंढी व्यवसायावर आधारित असलेल्या पूरक व्यवसायाचा अभ्यास करणे.

४) शेळीमेंढी पालन करणाऱ्या व्यावसायिकांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

५) शेळीमेंढी पालन व्यावसायासमोरील समस्या शोधून योग्य त्या उपाय योजना सुचविणे.

- **संशोधनाची गृहितके :—**

१) शेळीमेंढी पालन व्यवसायामुळे व्यावसायिकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा झाली आहे.

२) शेळीमेंढी पालन व्यवसाय हा आधुनिक पद्धतीने केला जात नाही.

३) शेळीमेंढी पालन व्यावसायामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीस हातभार लागतो.

४) शेळीमेंढी व्यावसायिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

५) शेळीमेंढी व्यवसायावर आधारीत अनेक पूरक व्यवसाय आहेत.

- **अभ्यास विषयाचे महत्त्व :—**

शेळीमेंढी पालन व्यवसायामुळे मोठया प्रमाणावर रोजगार निर्माण होतो. बऱ्याचशा लोकांच्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून या व्यवसायाकडे पाहिले जाते. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून या व्यवसायामधून शेतकऱ्यांना उत्पन्न प्राप्त होते. त्याचबरोबर शेतकऱ्यांचा रासायनिक खतावरील होणारा खर्च वाचतो. तसेच जमिनीचा कस टिकून राहतो. शेळयामेंढयाचे दूध आयुर्वेदिक दृष्टया महत्वाचे मानले जाते. इतर प्राण्यांच्या मांसापेक्षा शेळीमेंढीच्या मांसाला मोठया प्रमाणात मागणी आहे. तसेच इतर प्राण्याच्या तुलनेत शेळयामेंढयाच्या खाद्यावर होणारा खर्च कमी आहे व उत्पन्न जास्त आहे. शेळीमेंढी पालन व्यावसायिकांच्या समस्यांचा अभ्यास करून त्यावर उपाय सुचविणे हे या अभ्यास विषयाचे महत्त्व आहे.

- **संशोधन पद्धती :—**

अहमदनगर जिल्हयात १४ तालुके आहेत. यातील कर्जत, श्रीगोंदा व जामखेड या तालुक्याची संशोधकाने संशोधनासाठी निवड केली आहे. यात कर्जत तालुक्यातील — डिकसळ, तरडगांव, ताजु, गोयकरवाडी, खंडाळा, हंडाळवाडी, मिरजगांव,

बजरंगवाडी, राक्षसवाडी खु., राक्षसवाडी बु. व वायसेवाडी तर श्रीगोंदा तालुक्यातील – घोगरगाव, हंगेवाडी, चोरमलेवाडी, बनपिंप्री, चोराचीवाडी, थिटेसांगवी, कोकणगांव, भावडी, वांगदरी व कोळगांव आणि जामखेड तालुक्यातील – आरणगांव, खर्डा, चुंभळी, जवळा, झिक्री, नान्नज, पाडळी, बावी, फाक्राबाद, वंजारवाडी (धानोरा), हाळगांव, दिघोळ व चौंडी इत्यादी गावामधून संशोधक संशोधनासाठी ३०० व्यवसायिकांची निवड करणार आहे.

सदरील संशोधन हे प्राथमिक व दुय्यम साधनावर आधारीत आहेत. नमुन्याचे विश्लेषण करण्यासाठी योग्य तेथे सांख्यिकी तंत्राचा उपयोग करण्यात येईल तसेच प्रश्नावली, निरीक्षण, मुलाखत पद्धतीचा वापर करण्यात येईल.

- **प्रकरणांची रूपरेषा :—**

प्रस्तूत शोध प्रबंधाची मांडणी पुढील प्रकरणात केली जाणार आहे.

प्रकरण पहिले

प्रस्तावना

“प्रस्तावना” हे शोध प्रबंधातील पहिले प्रकरण असून या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना विषय निवडीचा उद्देश संशोधनाची गृहितके, अभ्यास विषयाचे महत्त्व, संशोधन पद्धती व शेळीमेंढी पालन व्यवसायाची सर्वसाधारण माहिती घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

" पूर्व संशोधन साहित्याचा आढावा" हे शोध प्रबंधातले दुसरे प्रकरण असून या प्रकरणात पूर्वी झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा थोडक्यात घेतला जाईल.

प्रकरण तिसरे

अहमदनगर जिल्हयातील आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

"अहमदनगर जिल्हयातील आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास" हे शोधप्रबंधातले तिसरे प्रकरण असून प्रस्तूत प्रकरणात अहमदनगर जिल्हयाची माहिती घेण्यात येईल. त्यामध्ये जिल्हयाचा भौतिक परिचय व ऐतिहासिक पार्श्वभूमी, जिल्हयातील आर्थिक व सामाजिक स्थितीमध्ये जाती—जमाती, भाषा, सण, उत्सव, कृषिव्यवसाय, इतर व्यवसाय अशा विविध मुद्याच्या आधारे अभ्यास केला जाईल.

प्रकरण चौथे

शेळीमेंढी पालन व्यवसायाचा अभ्यास

"शेळीमेंढी पालन व्यवसायाचा अभ्यास" हे शोध प्रबंधातले चौथे प्रकरण असून प्रस्तुत प्रकरणात शेळीमेंढी पालन व्यवसायाविषयी माहिती, शेळीमेंढीच्या जातीचे प्रकार, शेळीमेंढी आहार पद्धती, शेळीमेंढीवर आधारित पूरक व्यवसाय तसेच शेळीमेंढी पालन करणाऱ्या व्यावसायिकांचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण पाचवे

शेळीमेंढी पालन व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास

"शेळीमेंढी पालन व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास" हे शोधप्रबंधातील पाचवे प्रकरण असून प्रस्तूत प्रकरणात शेळीमेंढी पालन व्यावसायिकांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामाचा अभ्यास केला जाईल.

प्रकरण सहावे

निष्कर्ष व शिफारशी

"निष्कर्ष व शिफारशी हे शोधप्रबंधातील सहावे व शेवटचे प्रकरण असून या प्रकरणात सर्व प्रकरणांचा सारांश, निष्कर्ष व शिफारशीचा अभ्यास केला जाईल.

शोध प्रबंधाचा प्रस्तूत आराखडा प्राथमिक असून साधनांच्या उपलब्धतेनुसार प्रकरणांच्या संख्येत व रूपरेषेत कमी अधिक बदल होऊ शकतो.

संशोधक

प्रा.विठ्ठल व्यंकटी कासले.
एम. ए. (अर्थशास्त्र), बी.एड. नेट,
अर्थशास्त्र विभाग,
महात्मा फुले नूतन महाविद्यालय,
मिरजगांव. ता.कर्जत, जि.अहमदनगर
४१४४०१
vvkasle121@gmail.com

संशोधन मार्गदर्शक

डॉ. दिलीप साहेबराव काकडे
एम.ए.(अर्थशास्त्र),पीएच.डी.
अर्थशास्त्र विभाग,
श्री दत्त कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय,हदगाव, जि. नांदेड.
४३१७१२
dilipkakde2011@gmail.com